# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 08 April 2025**

**Time 7.10 AM to 7.20 AM**

**Language Marathi**

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक ०८ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- घरगुती वापराचं गॅस सिलिंडर ५० रुपयांनी महाग, सरकारने इंधन दरासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची काँग्रेसची मागणी
- सायबर गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी प्रयोगशाळांचे जाळे सक्षम करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- जागतिक आरोग्य दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यातल्या ५० क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींचा रौप्य पदकाने गौरव

आणि

- मराठवाड्यात तापमानात लक्षणीय वाढ, छत्रपती संभाजीनगरसह जालना आणि बीड जिल्ह्यात आज तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज

****

केंद्र सरकारनं घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरची किंमत ५० रुपयांनी वाढवली आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना हे सिलिंडर ५५० रुपयांना, तर इतरांना ८५३ रुपयांना मिळतील, अशी माहिती पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांना दिली. आजपासून हे दर लागू झाले.

पेट्रोल आणि डिझेलवरचं उत्पादन शुल्क लिटरमागे दोन रुपयांनी वाढवण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. पण त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना जाणवणार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्यामुळे, पेट्रोलियम कंपन्यांना स्वस्तात कच्चं तेल मिळत आहे. परिणामी या शुल्कवाढीचा फटका ग्राहकांना जाणवणार नाही, असं पेट्रोलियम मंत्र्यांनी सांगितलं.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरल्याच्या पार्श्वभूमीवर, पेट्रोल-डिझेलवरचे कर कमी करुन पेट्रोलचा दर ५१ रुपये आणि डिझेलचा दर ४१ रुपये प्रतिलीटर करावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. सरकारने इंधन दरासंदर्भात एक श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी सपकाळ यांनी केली.

****

येत्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या पार्श्वभूमीवर ओडिशामध्ये भुवनेश्वर इथं, केंद्रीय आयुष मंत्रालयांतर्गत मोरारजी देसाई योग संस्थेच्या ७५ दिवसांच्या योग महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं. जाधव यांनी या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली…

**बाईट – राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय मंत्री**

****

राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी विमा आणि इतर योजनांमधून केंद्र सरकार पैसा पुरवत आहेच, पण राज्य सरकारने गरजेनुसार मागणी केली तर अतिरिक्त मदत दिली जाईल, असं आश्वासन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिलं. नंदूरबार इथं काल कृषी विज्ञान केंद्रात कृषी विज्ञान मंडपम आणि महिला तंत्रज्ञान पार्कचं उद्घाटन चौहान यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. शेती आणि ग्रामीण विकास विभागाच्या योजनांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य तसंच लोकसहभागातून गरीबी मुक्तीसाठी विशेष योजना राबवणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयोगशाळांचं जाळं सक्षम करण्याचे निर्देश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंत्रणांना दिले आहेत. दक्षिण मुंबई विभागाच्या निर्भया सायबर प्रयोग शाळेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. नवं युग हे सायबर गुन्ह्यांचं असल्यामुळे पोलिस यंत्रणेनं तंत्रज्ञान स्नेही असण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली, ते म्हणाले…

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

दिव्यांगाना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असून, त्यांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार तसंच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते.

****

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यू प्रकरणात पाच पोलिसांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. यासाठी सहआयुक्त लखमी गौतम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेशही न्यायालयानं दिले आहेत.

****

जागतिक आरोग्य दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यातल्या ५० क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींना काल रौप्य पदकाने गौरवण्यात आलं. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या अध्यक्षतेखाली हा गौरव सोहळा पार पडला.

दरम्यान, धाराशिव इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीसाठी शासनाने ४०३ कोटी ८९ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी ही माहिती दिली. या वैद्यकीय महाविद्यालय आणि त्याच्या विस्तारित इमारतींसाठी एकूण आठ लाख २६ हजार चौरस फूट क्षेत्रावर बांधकाम करण्यात येणार असून, लवकरच याची निविदा प्रक्रिया पार पडेल, असं पाटील यांनी सांगितलं.

****

पुण्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या गर्भवतीच्या मृत्यूला रुग्णालयंच जबाबदार असल्याचं, चौकशी समितीच्या अहवालातून समोर आलं आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ही माहिती दिली. काल पुणे पोलिस आयुक्तालयात बैठक घेतल्यानंतर, पत्रकार परिषदेत त्यांनी ही बाब नमूद केली,

**बाईट – रुपाली चाकणकर, अध्यक्षा राज्य महिला आयोग**

या प्रकरणी माता मृत्यू अन्वेषण समिती आणि धर्मादाय आयुक्तांचा अहवाल आल्यानंतर रुग्णालयावर योग्य कारवाई करण्यात येईल असं चाकणकर यांनी सांगितलं.

दरम्यान, दीनानाथ रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर धनंजय केळकर यांनीही काल पत्रकार परिषद घेतली. या प्रकरणाशी संबंधित डॉ सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला आहे; येत्या गुरुवारपर्यंत ते सेवामुक्त होतील, असं केळकर यांनी सांगितलं. रुग्णाकडून किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून आगाऊ रक्कम घेण्याचं धोरण रुग्णालयानं रद्द केलं असून, रुग्णाशी संवेदनशीलतेनं वागण्याबाबत सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार असल्याचं केळकर यांनी सांगितलं.

****

लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांना पुढील उपचारासाठी हवाई रुग्णवाहिकेने काल मुंबईत नेण्यात आलं. त्यांच्या प्रकृतीत लातूर इथं सुधारणा होऊन ते धोक्याबाहेर असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. मनोहरे यांनी घरगुती वादातून डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला होता.

****

राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत ३० एप्रिलपर्यंत परभणी जिल्ह्यात कर्करोग तपासणी मोहीम राबवण्यात येत आहे. यासाठी तालुका आणि ग्रामीण स्तरावर कर्करोग निदान वाहनामार्फत आरोग्य शिबीरं घेण्यात येणार आहेत, अधिकाधिक रुग्णांनी त्याचा लाभ घ्यावा, असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ तालुक्यातील वगरवाडी जवळ कनर्नाटकहून येणार्या एका यात्रेकरुंच्या बसने अचानक पेट घेतला. चालकानं प्रसंगावधान दाखवल्याने, या दुर्घटनेतही कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र प्रवाशांच्या सर्व सामानासह संपूर्ण बस जळून खाक झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं 'जिल्हाधिकारी तहसीलच्या दारी' या उपक्रमात काल अनेक नागरिकांचे प्रश्न तात्काळ निकाली निघाले. शिधापत्रिका, सामाजिक अर्थसहाय्य योजना, जमिनीच्या मोजणीचे प्रलंबित प्रकरणे, फेरफार अशा समस्यांचा यात समावेश होता.

****

हक्काचं ठराविक मानधन देण्याच्या मागणीसाठी ग्राम रोजगार सेवकांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काल धरणे आंदोलन केलं. ग्राम रोजगार संघटनेच्या आंदोलनात शेकडो ग्राम रोजगार सेवक सहभागी झाले.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्रात विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने वाचन सप्ताह सुरू झाला. विद्यापीठाचे सिनेट सदस्य आणि धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास पाठक यांच्या हस्ते या सप्ताहाचं उद्घाटन झालं. विद्यार्थ्यांनी अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन करण्यासाठी वेळ द्यावा अस आवाहन पाठक यांनी केलं.

****

रेल्वे रुळ देखभालीच्या कामामुळे निजामाबाद – नांदेड – निजामाबाद गाडी काही दिवस पूर्णतः रद्द करण्यात आली असून, दौंड – निजामाबाद – दौंड ही गाडी काही दिवस अंशतः रद्द करण्यात आली आहे.

****

हवामान

राज्यात काल सर्वाधिक तापमान अकोला इथं ४३ पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात परभणी आणि बीड इथं सरासरी ४२, छत्रपती संभाजीनगर इथं ४१, नांदेड ४० पूर्णांक पाच, तर धाराशिव इथं ३९ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड जिल्ह्यात आज तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान खात्यानं व्यक्त केला आहे.

****